अपेक्षित बदल्यांसाठी धावाधाव

तांगडेंनी स्वीकारला एसीबी नाशिकचा पदभार; नवे अधिकारीही हजर नाही

नाशिक | प्रतिनिधी

गृहविभागाने राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यावर कार्यवाही सुरू असून अनेक जागा रिक्त झाल्यावर ज्यांची बदली झाली आहे त्यांनी 'चार्ज' सोडला नसून जे नव्याने बदलून येणार आहेत, तेदेखील हजर झाले नसल्याने नवनियुक्तांसह सध्याच्या अधिकाऱ्यांनी पुन्हा अपेक्षित बदलीसाठी 'धावाधाव' केल्याचे समजते. आगामी सिंहस्थासह मनपा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून सध्याच्या नियुक्त्या महत्त्वाच्या असल्याने 'मर्जी' राखण्याचेही प्रयत्न होण्याची शक्यता आहे.

राज्यातील अधीक्षक व उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश दहा दिवसांपूर्वी जारी करण्यात आले. त्यानुसार नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागात (एसीबी) अधीक्षक भारत तांगडे यांनी पदभार स्वीकारला आहे. मात्र नाशिक पोलीस आयुक्तालयात नियुक्त झालेले किशोर काळे व योगेश चव्हाण हे उपायुक्त शनिवारी (दि. ५) उशिरापर्यंत हजर झालेले नाहीत. सध्याचे उपायुक्त चंद्रकांत खांडवी व प्रशांत बच्छाव हेदेखील बदलीनंतर त्यांच्या पदभारावर कायम आहेत. एसीबीच्या तत्कालीन अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर या छत्रपती संभाजीनगरात उपायुक्त पदावर रुजू झाल्या असून शहर आयुक्तालयातून गुन्हे शाखेचे उपायुक्त प्रशांत बच्छाव यांची कोल्हापूर येथील नागरी हक्क संरक्षण विभागात तर मुख्यालय उपायुक्त चंद्रकांत खांडवी यांची धुळे येथील प्रशिक्षण केंद्रात बदली झाली आहे. मात्र, अद्याप त्यांनी 'चार्ज' सोडलेला नाही. दोघांनीही नाशिक एसीबी यासह इतर 'अपेक्षित' ठिकाणी बदलीकरता प्रयत्न केल्याचे समजते. त्यातच धुळे अपर अधीक्षक पदावरून हजर होणारे किशोर काळे व मुख्यमंत्री सुरक्षा विभागातून येणारे योगेश चव्हाण हेदेखील नाशिकमध्ये रुजू न झाल्याने त्यांचेही इतरत्र बदलीसाठी प्रयत्न सुरू आहेत की 'वेट अँण्ड वॉच'च्या भूमिकेत आहेत यासंदर्भात चर्चा सुरू आहे.

गुन्हे शाखा कोणाकडे?

शहर आयुक्तालयातील मुख्यालय व गुन्हे ही दोन्ही पदे रिक्त होत असून परिमंडळ एकचे उपायुक्त किरणकुमार चव्हाण आणि परिमंडळ दोनच्या उपायुक्त मोनिका राऊत यांच्या बदलीचे आदेश जारी झालेले नाहीत. त्यामुळे नवनियुक्तांपैकी एखाद्याची वर्णी गुन्हे उपायुक्तपदी लागण्याची शक्यता आहे. मात्र, बदलीनंतरही संबंधित अधिकाऱ्यांनी मूळ पदभार न सोडल्याने आयुक्तालयातील फेरबदलांची प्रक्रियाही रखडली आहे. सिंहस्थाच्या दृष्टिकोनातून पुढील चार-पाच वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत राहण्यासाठी इतर वरिष्ठ निरीक्षकांनीही अपेक्षित पोलीस ठाणे व पथकांच्या 'प्रभारी' पदाकरता जोर लावला आहे.

उदारांचा राणा पंढरीस आहे

आषाढी एकादशी म्हणजे महासोहळा महाराष्ट्राचा! धर्म व परंपरा यादृष्टीने या तिथीला महत्त्व आहेच... पण संस्कृती व भाषावैभव या अंगानेही या दिवसाची महत्ता मोठीच आहे. आषाढी म्हणजे संतांचे अभंग... म्हणजेच मराठी भाषेचा सर्वव्यापी गजर! पंढरपुरातले फक्त पांडुरंगाचेच राऊळ नव्हे तर तिथली एकूण मंदिरे, मठ, धर्मशाळा, चौक, रस्ते, वाडेहुडे, घरे, झोपड्या आणि चंद्रभागेचे वाळवंट, नदीपात्रातल्या होड्यासुद्धा अभंगांनी भारावलेल्या असतात. मग आळंदी, देहू, पैठण, नरसी, त्र्यंबकेश्वर, सासवड, कोथळी, अरण, तेर, मंगळवेढा, नेवासे, शिऊर, गंगाखेड, आपेगाव अशी संत वास्तव्याने पुनित झालेली गावे घ्या... किंवा मग महाराष्ट्रातली सर्व इतर तीर्थक्षेत्रे, जिल्ह्या-तालुक्यांची ठिकाणे, बाजारपेठांची गावे नाहीतर अगदी लहानुली खेडोपाडी पाहा... सर्वत्र केवळ मराठी भाषेतल्या अभंग रचनाच दुमदुमत असतात. नामदेवांनी शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा केली होती. अभंग करणे म्हणजे तेवढ्या संख्येत अभंग लिहिणेच असे नाही... तर तेवढ्या संख्येत त्यांची उजळणी करणे असाही अर्थ होऊ शकतो! शतकोटी म्हणजे एक अब्ज... गेल्या ७०० वर्षांत किती एकादश्या, किती वाऱ्या, किती सप्ते, किती कीर्तने झाली याचा विचार केल्यास, शतकोटीच काय, शतअब्ज अभंग उजळणी महाराष्ट्राने केलीच असणार!

हे अभंग, त्यांचे गायन, त्यांचे निरूपण, मधूनच होणारे संतांचे जयजयकार हे सगळे आपल्या संस्कृतीचाच भाग होऊन बसले आहे. दोन ओळींचा निरोपही कोणीच कोणाला पाठवत नाही, पण ठरल्या दिवशी हजारो माणसे, उरल्या गावी जमा होतात

भाग-२६

नंदन रहाणे

आणि संतांच्या पालख्यांसोबत पंढरीच्या दिशेने चालू लागतात. पुढ्यातल्या पत्रावळीवर जे पडेल ते खातात. शाळेचे व्हरांडे असोत की मैदानावरची माती... जिथे मिळेल तिथे पाठ टेकतात. हालअपेष्टा सोशीत थेट पंढरपूर पायीपायीच गाठतात. तिथे कोणीच कोणाचा सत्कार करणार नसते किंवा काही मानधनही मिळणार नसते. उलट पंढरपूरला पोचेपर्यंत खिशातली रक्कमही खर्च होऊन गेलेली असते. मग हा सारा खटाटोप, इतका आटापिटा माणसे दरवर्षी का करतात? त्यांच्या पदरात नेमके काय पडत असते?

उदारांचा राणा पंढरीस आहे।
उभारोनी बाहे ।
पालवितो ।।१।।
जाणतियाहूनी नेणत्याची गोडी।
आलिंगी आवडी ।
करुनिया ।।२।।
दुःखाचियासाठी तेथे
मिळे सुख ।
अनाथांची भूक ।
दैन्य जाय ।।३।।
शीण घेऊनिया प्रेम
देतो साटी ।
न विचारी तुटी।
लाभ काही ।।४।।
तुका म्हणे असो अनाथ
दुबळी ।
आम्हांसी तो पाळी ।
पांडुरंग ।।५।।

'जगद्गुरू' असा ज्यांचा गौरव उभा महाराष्ट्र गेली ३५० वर्षे करतो आहे, त्या देहूच्या वाण्याचा, सावकार महाजनाचा हा अभंग आहे. तुकाराम बोल्होबा आंबिलेमोरे हे त्या महाकवी संताचे नाव. संत शिरोमणी नामदेव महाराजांनी पांडुरंगासह स्वप्नात येऊन त्यांना अभंगरचनेची प्रेरणा दिली आणि मग हा कुणबी संतकवी तर झालाच, पण मराठी काव्यमंदिराचा झळाळता कळसही ठरला! ते तुकोबाराय एकूणच वारी, पंढरी, विठोबा यांचे मर्म या अभंगात उलगडून दाखवत आहेत... या जगात जेवढे काही उदार दानशूर आहेत त्यांचा राजा या पंढरीत उभा आहे. दोन्ही बाहू उंच करून तो भक्तांना आपल्याकडे बोलावत असतो. अतिविद्वान, महाव्यासंगी, वादविवादपटू, वैय्याकरणी, भाषाकोविद अशा मंडळींपेक्षा त्याला भोळ्या भाबड्या, निर्मळ, निरागस जनांची गोडी आहे. त्यांना तो प्रेमभराने आलिंगन देतो. त्यांची दुःखे स्वतःकडे घेऊन तो त्याबदल्यात सर्व सुखे देतो. त्यामुळे अनाथांना पाठीराखा मिळून पोरकेपण संपते व त्यांची तहान-भूक व दैन्यदारिद्र्य यांचा उपशम होतो.

त्याच्यापर्यंत पोचताना जो काही शीणभाग झालेला असतो तो ओसरून, त्याच्या घट्ट दाट प्रेमाचा लाभ सर्वांनाच होतो. या त्याच्या व्यवहार व्यापारात तो नफा-तोट्याचा अजिबातच विचार करत नाही. तुकोबा म्हणतात, आम्ही दीनदुबळे असू, अडाणी, अनगड असू... पण तो पांडुरंगच आम्हाला राखतो, पाळतो यावर आमचा दृढ विश्वास आहे! पंढरीला आषाढीच्या दिवशी एवढे १२-१५ लाख लोक गोळा होतात, कारण त्यांना तुकोबांच्या या शब्दांचा अनुभव आलेलाच असतो!

गुन्हेशोध पथकाचा कत्तलखान्यावर छापा

सहा संशयित ताब्यात; सोळा लाखांचा मुद्देमाल हस्तगत

इंदिरानगर | वार्ताहर

इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने कत्तलखान्यावर छापा टाकून १५ लाख ९० हजार रुपयांच्या मुद्देमालसह सहा संशयितांना ताब्यात घेतले.

गुन्हे शोध पथकाचे अंमलदार सौरभ माळी यांना गोपनीय माहिती मिळाली की, वडाळागाव, म्हाडा वसाहतीच्या पाठीमागे एका पत्र्याच्या घरात गोवंशाची कत्तल करून त्याची वाहतूक केली जाणार आहे. त्यानुसार गुन्हे शोध पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता संशयित आरोपी नासिर कय्यूम शेख (४०, रा. कसईवाडा, वडाळानाका, नाशिक), अब्दुल रहिम कुरेश (३७, रा. वडाळानाका, नाशिक), सईद मजिद कुरेशी (३५, रा. नागसेन नगर, वडाळानाका), हसनैन अफरोज कुरेशी (१९, रा. कादरी मस्जिदजवळ, बागवानपुरा, नाशिक), अफरोज बिस्मील्ला कुरेशी (५१, रा. कादरी मस्जिदजवळ, बागवानपुरा, नाशिक), रहीम अब्दुल्ला कुरेशी (५८, रा. श्रमिकनगर, गंजमाळ, नाशिक) यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडून दोन इनोव्हा कार, सात दुचाकी, २०० किलो गोमांस असा एकूण १५,९०,००० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. सदरची कारवाई इंदिरानगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

वाहनांची चोरी

नाशिक | पंचवटीतील अमृतधाम परिसरातून मोपेड चोरून नेण्यात आली. अनंत प्रभाकर नवले (रा. श्याम अपार्टमेंट, बळी मंदिराजवळ, अमृतधाम) यांची मोपेड बुधवारी (दि.२) मध्यरात्री अपार्टमेंटच्या पार्किंगमधून चोरण्यात आली. पंचवटी पोलिसात गुन्हा दाखल आहे. तर भाऊपाटील निंबा शेवाळे (रा. साळुंखेनगर, कामटवाडा) यांची दुचाकी गुरुवारी (दि.३) दुपारी चारच्या सुमारास पवननगर येथील जे. एस. बेकर्स दुकानासमोर पार्क असता चोरट्याने चोरून नेली. अंबड पोलिसात गुन्हा दाखल आहे. तसेच त्र्यंबक बयाजी पाळदे (रा. बेलतगव्हाण, चेहडी रोड) यांची दुचाकी २३ जून रोजी दुपारी तीन ते पाच यादरम्यान ॲव्हेन्यू अपार्टमेंटच्या पार्किंगमधून चोरट्याने चोरून नेली. नाशिकरोड पोलिसात गुन्हा दाखल आहे.

अल्पवयीनाकडून चोरीच्या दुचाकी हस्तगत

नवीन नाशिक | प्रतिनिधी

अंबड पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने राजे संभाजी स्टेडियमच्या मागे सापळा रचून एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून अंबड व गंगापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरी केलेल्या दोन मोटारसायकल हस्तगत केल्या.

गुरुवारी (दि.३) मनीष मोहन (४६, व्यवसाय-फॅब्रिकेशन दुकान, रा. फ्लॅट नं.६, वर्धा हाऊसिंग सोसा., चाणक्यनगर, कामठवाडा, नाशिक) यांनी त्यांची होंडा कंपनीची पांढऱ्या रंगाची मोटारसायकल (एम.एच.-१५-एफ.ई०६४७) ही ३० जून रोजी संध्याकाळी ६ ते ७ वाजेच्या सुमारास शिवाजी चौक, भाजी मार्केट येथून कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास करत असताना अंबड पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील अंमलदार प्रवीण राठोड यांना गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्ह्यातील चोरी केलेली मोटारसायकल एक व्यक्ती बुरकुले लॉन्स, राजे संभाजी स्टेडियमच्या मागे विक्री करण्याकरता येणार आहे. त्यांनी सदरहू माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांना दिली. कड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पडोळकर,पोलीस शिपाई प्रवीण राठोड, सचिन करंजे, तुषार मते, राकेश पाटील, मयूर पवार यांच्या पथकाने सापळा रचून एका संशयिताला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडे विचारणा केली असता तो अल्पवयीन असल्याचे समजले. पोलिसांनी त्याच्याकडून दोन मोटारसायकल हस्तगत केल्या आहेत.

लॅपटॉप लांबवला

नाशिक | शरणपूररोडवरील अपार्टमेंटमधून चोरट्याने लॅपटॉप चोरून नेला. हितेश महेंद्र सागर (२४, रा. वऱ्हाळे, ता. देवळा. सध्या रा. परशुराम अपार्टमेंट, रचना शाळेजवळ) याच्या फिर्यादीनुसार, तो शिक्षणानिमित्त शहरात वास्तव्यास असून, तो राहत असलेल्या फ्लॅटमधून २८ जून ते १ जुलै यादरम्यान ३० हजारांचा लॅपटॉप चोरट्याने लंपास केला. सरकारवाडा पोलिसात गुन्हा दाखल आहे.

तडीपार ताब्यात

नाशिक | पेठरोडवरील अश्वमेघनगर येथून तडीपारास म्हसरूळ पोलिसांनी अटक केली. कुणाल सुधाकर एखंडे (२४, रा. पिंगळे मळा, मखमलाबाद) असे तडीपाराचे नाव आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये कुणालला दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले होते. तरीही तो शहरात विनापरवानगी आल्याची माहिती कळताच पोलिसांनी शुक्रवारी (दि. ४) दुपारी दीडच्या सुमारास अटक केली. म्हसरूळ पोलिसात गुन्हा दाखल आहे.

सातपूरला हिट अँण्ड रन

स्कॉर्पिओने मायलेकासह डिलिव्हरी बॉयला उडवले; चालक ताब्यात

नाशिक | प्रतिनिधी

एका तरुणाने भरधाव वेगात स्कॉर्पिओ चालवून रस्त्याने जाणाऱ्या तिघांना चिरडल्याची घटना सातपूर येथील स्कॉडा शोरूमजवळ शुक्रवारी रात्री घडली. या घटनेत काही वाहनांसह टपरीचे नुकसान झाले असून चालकासह स्कॉर्पिओतील चौघे टवाळखोर रॅश ड्रायव्हिंग करून पळून गेले. मात्र, पोलिसांनी तुटलेल्या नंबरप्लेटसह सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चालकासह कार ताब्यात घेतली आहे. याबाबत गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नितीन राजेंद्र पाटील (३२) व त्यांची आई विमलाबाई राजेंद्र पाटील (५५, रा. धनश्री हाईटस्, भवर टॉवरजवळ, सातपूर) व स्वप्निलकुमार रवींद्र पाटील (२५, रा. ध्रुवनगर, गंगापूररोड) अशी अपघातात गंभीर झालेल्या तिघांची नावे आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शुक्रवारी रात्री नऊ ते दहा वाजेच्या सुमारास सातपूर रोडवरील स्कॉडा वाहनाच्या शोरूमजवळून पाटील हे आईसह जात होते. तसेच स्वप्निकुमार हादेखील रस्त्याने जात होता. तेव्हा स्कॉर्पिओ कार (एमएच १५ बीएक्स ५५०८) वरील संशयित चालकाने अशोकनगरकडून भरधाव वेगात चालवून आणली. चालक व कारमधील तरुणाई जोशात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि रस्त्याने जाणाऱ्या चार ते पाच दुचाकींना धडक दिली. तसेच रस्त्यावरील एका टपरीला ठोस मारून नुकसान केले. त्यानंतर चालकाने कारसह पळ काढला. या घटनेची माहिती कळताच सातपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रणजित नलावडे यांच्यासह अधिकारी आणि अंमलदार दाखल झाले. त्यांनी इतर नागरिकांच्या मदतीने तिघाही जखमींना रुग्णालयात दाखल केले.

* जखमींवर शर्थीचे उपचार सुरू
* चार वाहनांसह टपरीचे अतोनात नुकसान
* घटनेमुळे परिसरात काहीकाळ भीतीचे वातावरण
* संशयितावर मोटार वाहन अधिनियम सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न आणि मालमत्तेचे नुकसान केल्याचे गुन्हे.

चौघे नशेत

प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, चालक व त्याचे तीन साथीदार मद्याच्या नशेत होते. त्यांनी सातपूर रोडवरून रॅश ड्रायव्हिंग करून वाहनांना चिरडले. त्यामुळे अशा तरुणाईवर कायद्यान्वये अंकुश आणावा, अशी मागणी केली आहे. दरम्यान, संशयितांचा ताबा घेऊन त्यांची वैद्यकीय चाचणी करण्यात आली आहे. मद्य प्राशन केल्याचे अहवालात नमूद असल्यास त्यांच्यावर ड्रंक ॲण्ड ड्राईव्हनुसार वाढीव कलमान्वये कारवाई केली जाणार आहे.

दोघांची आत्महत्या

नाशिक | नाशिकरोड आणि अंबड भागात दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनांचे कारण समोर आले नसून पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूच्या नोंदी करण्यात आल्या आहेत. मृतात एका शेतकऱ्याचा समावेश आहे. जयराम बापू वलवे (५०, रा. गंगापाडळी, ता. नाशिक) यांनी शुक्रवारी (दि.४) रात्री आठपूर्वी शेतातील कांद्याच्या चाळीतील लोखंडी पाईपला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. नाशिकरोड पोलिसात मृत्यूची नोंद झाली आहे. तर योगेश जगन्नाथ हसे (४१, रा. दुर्वांकूर गार्डन, वृंदावननगर) यांनी गुरुवारी (दि.३) घराच्या बेडरूममध्ये गळफास घेतला. सुरेश गुंजाळ यांनी उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तपासून मृत घोषित करण्यात आले. अंबड पोलिसात मृत्यूची नोंद झाली आहे.

क्लासिफाईड /सुपरमार्केट

खरेदी/विक्री

नाशिकपासून ३५ किलोमीटर, डांबरी रोड टच, केजीएस साखर कारखान्या लगत, विहिरीला भरपूर पाणी असलेली व लेवल १५ एकर जमीन विकणे आहे, गाव : पिंपळगाव निपाणी, तालुका निफाड, जिल्हा नाशिक. संपर्क - 9422751526
(06/07-CM-324)

प्लॉट विकणे आहे - ॲमिनिटी प्लॉट @ सिन्नर एस.जी. पब्लिक स्कूलशेजारी, सिन्नर, गट नं. २७९/२, प्लॉट नं. ७५, प्लॉट एरिया : 2964 Sq.Mtr., साईट : शिर्डी-सिन्नर रोडपासून, 800 Mtr. अंतर, एस.जी. पब्लिक स्कूलजवळ, सिन्नर बस स्टॉप 4.5 km. शिवार : सिन्नर, पाण्याची सोय : आहे, लाईटची सोय : आहे, वापर स्कूल, हॉस्पिटल, सोईचे दुकान, हेल्थ क्लब, सिनियर सिटीझन हौसिंग, स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, पार्किंग लोटस्, बँक एमटीएम, ओपन मार्केट. संपर्क :श्री. महाजन, 9324805881.
(07/07-/CM-327)

प्लॉट विकणे

विल्होळी, हायवेलगत ३१७ वार टायटल क्लिअर प्लॉट विकणे आहे. 9822695788
(09/07-BK-2727)

रो-हाऊस प्लॉट विकणे - रासबिहारी शाळेजवळ २००, ४००, ८००, १२०० वार, गंगापूररोड, मखमलाबाद, चांदशी प्लॉट विकणे. 9637915599
(09/07-BK-2728)

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/26)
(CRINV-23-24JL/CRG00555)

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. WWW. drpalve nashamukti kendra.in, १००% रिझल्ट.
(09/01/26)
(CRINV-23-24JL CRG00554)

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752.
(09/01/26)
(CRINV-23-24JL/CRG00556)

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.
या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ **जाहिरात विभाग,** दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆**नाशिकरोड :** प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६◆ **निफाड :** मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००◆**दिंडोरी :** दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८◆ **मालेगांव :** पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२◆**सिन्नर :** दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.

नाशिकरोड येथे पेट्रोलपंपावर दगडफेक

घटना सीसीटीव्हीत कैद; कामगारांना मारहाण

नाशिक | प्रतिनिधी

दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचा राग मनात धरून पाच ते सहा युवकांनी पेट्रोलपंपावर जाऊन दोन कामगारांना मारहाण केली. शिवाय धारदार शस्त्राने हल्ल्याचा प्रयत्न करत पेट्रोलपंपावर दगडफेक केली. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, ही घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली आहे.

फिर्यादी इर्शाद युसूफ सय्यद (३९, रा. गोसावीवाडी, नाशिकरोड) हे बिटको चौकातील पेट्रोमाईन पेट्रोलपंपावर काम करतात. २ जून रोजी रात्री कामावरून घरी जात असताना वास्को चौकात त्यांच्या ओळखीचे रोहित गायकवाड आणि विकी हे दोघे भेटले. त्यांनी दारू पिण्यासाठी पैसे मागितले, मात्र सय्यद यांनी नकार दिला. त्याचा राग मनात धरून ४ जून रोजी रात्री रोहित गायकवाड, सुमित खरे, विकी आणि त्यांच्या चार-पाच साथीदारांनी पेट्रोलपंपावर येऊन गोंधळ घातला.

या ठोळक्याने सय्यद यांचे सहकारी वाहिद शेख यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर पेट्रोलपंप जाळून टाकण्याची धमकी दिली आणि दगडफेक करत तेथून पळ काढला. सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. याप्रकरणी इर्शाद सय्यद यांच्या तक्रारीवरून आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयंत शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली उपनगर पोलीस करत आहेत.

महिलेचा मृतदेह आढळला

नाशिक | आडगाव पोलिसांच्या हद्दीतील नांदूर नाका येथील दसक पुलाखालील गोदा पात्रात अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला. तिचा मृत्यू पाण्यात पडल्याने बुडून किंवा उडी घेऊन आत्महत्या केल्याने झाला, याचा तपास सुरू आहे. आडगाव पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून शुक्रवारी (दि.४) सकाळी नऊ वाजता ५५ ते ६० वयोगटातील महिलेचा मृतदेह आढळला.

तरुणीची आत्महत्या

नाशिक | सातपूरच्या श्रमिकनगर येथील १७ वर्षीय तरुणीने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. कोमल गोरख पाटील (१७, रा. श्रमिकनगर, सातपूर) असे मृत मुलीचे नाव आहे. कोमलने मंगळवारी (दि.१) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास बेडरुममध्ये ओढणीने गळफास घेतला. सातपूर पोलिसात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

निधन वार्ता...

शशिकला आंबेकर

नाशिक | शशिकला धनंजय आंबेकर/सहस्रबुद्धे (७३) यांचे इंदिरानगर नाशिक येथे अल्पशा आजाराने निधन झाले. आदिवासी आयुक्तालय येथे सहाय्यक आयुक्तपदावरून त्या निवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुली, एक मुलगा, सून आणि नातू असा परिवार आहे.

शकुंतलाताई नागरे

नाशिक | सुवर्णकार समाजातील ज्येष्ठ समाजसेवक नारायणशेठ नागरे यांच्या पत्नी शकुंतलाताई नारायणशेठ नागरे यांचे निधन झाले. सुरेश शेठ व कृष्णाशेठ यांच्या त्या वहिनी होत.

बाबूलाल डाडावाला

नाशिक | अग्रवाल समाज व हॅपी थॉटचे क्रियाशील कार्यकर्ते बाबूलाल जुगलकिशोर डाडावाला यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अग्रवाल सभेचे संचालक आदेश डाडावाला यांचे ते वडील होत.